"**डस्टर**" या बाबीची दर निश्चितीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग संचालनालय,**

**नवीन प्रशासन भवन, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना, मुंबई-४०० ०३२.**

**आदेश क्रमांक. उसं/भांखस/डस्टर/दरनिश्चिती/(१२९)/२०१६-२०१७/भा- 15015 दिनांक:-**

19 DEC 2016

**वाचा :- १) शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस -२०१४/ प्र.क्र. ८२ / भाग- III/ उद्योग -४, दिनांक ३०/१०/२०१५ व दिनांक ०१/१२/२०१६**

**२) मध्यवर्ती भांडार खरेदी समितीची बैठक दि.१५/१०/२०१६ चे इतिवृत्त दि. १६/१२/२०१६**

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग- III/ उद्योग -४, दिनांक ३०/१०/२०१५ मधील परिच्छेद ५.१४ नुसार परिशिष्ट -१८ मध्ये अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्थानी उत्पादीत केलेल्या वस्तूंना आरक्षण देण्यात आले आहे. अशा संस्थांनी उत्पादीत केलेल्या वस्तुंची दरनिश्चिती मध्यवर्ती भांडार खरेदी समितीकडून करण्यात येते. त्यानुसार "**डस्टर**" या बाबीची सन २०१६-२०१७ या वर्षासाठी दरनिश्चिती करण्यासाठी मे. दि. एन.एस.डी. ब्लाईंड इंडस्ट्रियल होम, वरळी, मुंबई. या संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या भांडार खरेदी समितीने दिनांक १५/१०/२०१६ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार "**डस्टर**" या बाबीचे सन २०१६-२०१७ या वर्षासाठी खालील प्रमाणे दर सदर संस्थेसाठी निश्चित केले आहेत.

| **अ. क्र.** | **दरनिश्चिती बाब** | **कच्चा माल** | **सन २०१६-२०१७ करिता निश्चित केलेले दर** |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | **कॉटन डस्टर,**<br>७५ सें. मी. X ७५ सें. मी.<br>वजन १२० ग्रॅम | वार्प २/२० कॉटन(६० ग्रॅम)<br>उभे धागे- ३६ प्रती इंच,<br>वेप्ट ६ इंच (६५ ग्रॅम)<br>आडवे धागे -२४ प्रती इंच,<br>धागा ४ मी. (६० नंबर) | रु. ३९.०० प्रति नग<br>मुंबई मध्ये मोफत पोहोच.<br><br>रु. ४१.०० प्रति नग<br>मुंबई बाहेर संपूर्ण महाराष्ट्रात मोफत पोहोच. |

सदर दरनिश्चितीची **विधिग्राह्यता दि.३०/०४/२०१७** पर्यंत राहील. वरील दर सर्व कर समाविष्टित असून त्यात मुल्यवर्धित कर व उत्पादन शुल्काचा समावेश आहे. सदर दर खरेदीदार कार्यालयापर्यंत मोफत पोहोच असे आहे.

**अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्थांनी स्वत:च उत्पादन केलेल्या वस्तूंचा शासकीय कार्यालयांना पुरवठा करावा, व बाजारातून वस्तू विकत घेवून शासनास पुरवठा करु नये. तसेच अंध व अपंग यांच्या धर्मादाय संस्था यांनी अंध व अपंग व्यक्तीकडूनच शासकीय कार्यालयानी दिलेली कामे पुर्ण करुन घ्यावेत.**

**पुरवठा कालावधी :-** मागणीपत्र मिळाल्यापासून ०८ आठवड्याच्या आत पुरवठा करणे आवश्यक राहील. तसेच शासकीय कार्यालयास केलेल्या पुरवठयाबाबतचा अहवाल प्रत्येक महिन्याला मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करावा.

**देय रक्कमेबाबतच्या अटी :-** मागणीकार कार्यालयाने माल प्राप्त झाल्यावर कामाचे त्वरीत निरीक्षण करण्यात यावे. या निरीक्षणात मालामध्ये आढळलेल्या उणीवा/ त्रुटी/ दोष ताबडतोब पुरवठादारांच्या व खरेदी संघटनेच्या/ खरेदी समितीच्या नजरेस आणाव्यात. ही कार्यवाही वस्तु पुरवठयाच्या तारखेपासून १५ दिवसात करण्यात यावी. कामाचा निरीक्षण व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९०% रक्कम ०२ आठवडयामध्ये संस्थाना द्यावी व उर्वरित १०% रक्कम सर्व मालाची पोच कार्यादेशानुसार सुस्थितीत व विनिर्देशांप्रमाणे झाल्यानंतर ३० दिवसांपर्यंत अदा करणे आवश्यक राहील. पुरवठा कालावधीमध्ये मालाचा पुरवठा न झाल्यास उशीरा पुरवठा केलेल्या मालाच्या किंमतीवर ०.५% प्रती आठवडा प्रमाणे दंड मागणीकार कार्यालयामार्फत आकारला जाईल व त्याची कमाल मर्यादा खालीलप्रमाणे असेल.

अ) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या कामाची किंमत दोन लाखापेक्षा कमी असेल तर अशा किंमतीच्या १०% दंड आकारला जाईल.

ब) पुरवठा कालावधी मध्ये पुरवठा न केलेल्या मालाची किंमत दोन लाखापेक्षा जास्त असेल तर अशा किंमतीच्या ५% दंड आकारला जाईल.

सदरील दंडाची वसूली करण्याची संपूर्ण जबाबदारी मागणीकार कार्यालयाची असेल. पुरवठा होणा-या मालाची/ वस्तूची गुणवत्तेबाबतची तपासणी मागणीकार कार्यालयाने करावी. ज्या संस्थाकडून वस्तूचा पुरवठा करणे शक्य नसेल त्या संस्थांनी अशा वस्तुंची यादी मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेस सादर करणे आवश्यक राहील.

**उद्योग सह संचालक (भां.ख.)**
**विकास आयुक्त (उद्योग) यांचेकरीता.**

**प्रति,**

१) मे. दि. एन. एस. डी. ब्लाईंड इंडस्ट्रियल होम, वरळी, मुंबई.

२) निवड नस्ती.